MHAH080023622022

**नियमित दरखास्त क्र.१४९/२०२२ मधील निशाणी क्रमांक २५ वर आदेश.**

(कारभारी गोपाळा पावबाके विरुध्द उत्तम मुरलीधर पावबाके व इतर)

**(दिनांक ०३/१०/२०२४ रोजी)**

सदर दरखास्तीने वादीने/धनकोने प्रतिवादी/रुणको विरुध्द प्रतिवादीने केलेल्या ओट्याचे व ग्रिलचे बांधकाम काढुन मिळण्यासाठी दाखल केली आहे. प्रतिवादींना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका २१ नियम २२ ची नोटीस लागली परंतु प्रतिवादींनी ओटा व ग्रिल काढुन घेतले नाही. मे. तहसिलदार यांनी रस्ता मोकळा करुन वादीस दिलेला आहे. परंतु, हुकूमनाम्याप्रमाणे प्रतिवादींनी ओटा व ग्रिलचे बांधकाम काढुन घेतले नाही. सबब, सदर ओटा व ग्रिलचे बांधकाम काढुन मिळण्यासाठी कमिशनची नेमणुक व्हावी यासाठी वादीने **नि.१५** अन्व्ये अर्ज दाखल केला होता परंतु, सदर अर्ज नामंजुर झाल्याने व दिवाणी प्रक्रिया संहितेचे कलम ४७ प्रमाणे स्थळ निरीक्षण आवश्यक असल्याने दरखास्तीच्या बजावणीसाठी स्थळ निरीक्षण करुन दावा मिळकतीच्या उत्तर बांधापासुन रस्त्यालगतचे २० मिटर रुंदीच्या क्षेत्रात काय काय बांधकाम आहेत याचे स्थळ निरीक्षक करुन रिर्पोट करण्यासाठी न्यायालयीन आयोगची नेमणुक व्हावी व त्यांनी वादी व प्रतिवादी यांना नोटीस देवुन दावा मिळकतीचे स्थळ निरीक्षण करुन त्याचा हात नकाशा करुन नकाशात प्रत्यक्ष २० मिटर उत्तर-दक्षिण क्षेत्रात ऋणकोचे कोणकोणते बांधकाम येते व ओटा, ग्रीलचे मोजमापासह न्यायालयास रिर्पोट करावा या कामी योग्य तो हुकूम व्हावा अशी विनंती केली.

**०२.** प्रतिवादी/रुणको यांनी **नि.२७** वर म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, **नि.२५** वरील अर्ज खोटा व बेकायदेशिर असुन वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा असल्याने प्रतिवादीस मान्य नाही. सदर अर्जामध्ये धनकोने असे नमुद केले आहे की, दावा मिळकतीच्या उत्तर बांधापासुन रस्त्यालगतचे २० मिटर रुंदीच्या क्षेत्रात काय काय बांधकाम आहेत याचे स्थळ निरीक्षक करुन रिर्पोट करण्यासाठी न्यायालयीन आयोगची नेमणुक व्हावी हे कथन वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहे कारण हुकूमनाम्यामध्ये दावा मिळकतीच्या पश्चिम बाजुने असलेल्या मोकळ्या जागेतील ओटा या विषयी आदेश दिलेला आहे त्यामुळे धनकोला हवी असलेली परिस्थिती पटलावर आणण्यासाठी धनको न्यायालयाकडुन न्यायालयीन आयोगामार्फत पुरावा

गोळा करु शकत नाही. स्थळ पाहणीसाठी सर्व निरीक्षणे मंडल अधिकारी व तलाठी यांनी दाखल केलेल्या पंचनाम्यामध्ये नमुद आहेत. त्यामुळे, त्यासाठी वेगळा मार्गाने अवलंब करण्याची आवश्यकता नाही असे ऋणकोचे कथन आहे. ऋणकोतर्फे असा युक्तीवाद करण्यात आली की, स्थळ निरीक्षणासाठी हुकूमनाम्याप्रमाणे धनकोला रस्ता उपलब्ध झाला आहे किंवा केस व हुकूनाम्याप्रमाणे ठराविक दिशेकडुन ठराविक मोजमापाचे अंतर ठरविण्यासाठी खाजगी न्यायालयीन आयोगाची नेमणुक करुन न्यायिक हेतु साध्य होणार नाही परंतु, तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, संगमनेर यांची नेमणुक केल्यास योग्य त्या पध्दतीने हुकूमनाम्यास अपेक्षीत प्रमाणे ठराविक दिशेने ठराविक अंतराचे मोजमाप तज्ञ पध्दतीने होवू शकते. त्यामुळे, न्यायालयीन आयोगाची नेमणुक करण्याचे न्यायालयाचे मत झाल्यास तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, संगमनेर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक व्हावी अशी विनंती केली.

**०३.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. सदर दरखास्त रे.मु.क्र.१०१/२००६ मधील हुकूमनाम्याची अंमलबजावणीसाठी दाखल केलेला असुन सदर दाव्यातील हुकूमनामा मा. मुंबई उच्च् न्यायालय, औरंगाबद खंडपिठ यांच्याकडील द्वीतीय अपिल क्र.३००/२०१८ मधील आदेशानुसार कामय करण्यात आले आहे. सदर हुकूमनाम्यानुसार प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना ओट्याचे बांधकाम काढुन पश्चिमेकडील २० मिटर रस्ता वादीस खुला करुन देण्याचे आदेश देण्यात आले आहे.

**०४.** रे.मु.क्र.१०१/२००६ मधील हुकूमनाम्यामध्ये प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना संबंधीत ओटा व ग्रिल काढुन २० मिटरचा खुला रस्ता पश्चिम बाजुने देण्याबाबत विशिष्ठ निर्देष देण्यात आले आहेत. परंतु **नि.२३** सोबत दाखल असलेल्या पंचनाम्यामध्ये ओटा काढल्याबाबत नमुद असले तरी दाखल छायाचित्रांमध्ये ओटा व ग्रिल काढल्याचे दिसुन येते नाही. परंतु, प्रतिवादीतर्फे दाखल मंडल अधिकारी, संगमनेर यांनी केलेला दि.१६/०६/२०२२ रोजीचा पंचनामा पाहता सदर पंचनाम्यामध्ये ओटा काढल्याचे नमुद आहे. त्यामुळे सध्या परिस्थितीला हुकूमनाम्याप्रमाणे २० मिटर रस्ता ओटा व ग्रिल यांचा अडथळा दुर करुन खुला करुन दिला आहे किंवा कसे याबाबत दिवाणी पक्रिया संहिता कलम ४७ प्रमाणे चौकशी करण्याठी स्थळ पाहणी करणे न्यायोचित होईल. तसेच धनको यांनी सदर अर्जामध्ये दावा मिळकतीच्या उत्तर बांधापासुन रस्त्या लगतच्या २० मिटर रुंदीच्या क्षेत्रात काय काय बांधकाम आहे याच्या स्थळ निरीक्षणाबाबत निर्देष देण्यात यावे अशी विनंती केली आहे. परंतु, रे.मु.क्र.१०१/२००६ मध्ये आदेश व

हुकूमनामा पाहता प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना पश्चिमेकडील २० मिटर जागेत बांधलेला ओटा काढुन घ्यावा व वादींना/धनको यांना पश्चिमेकडील ओढ्याच्या बाजुने आणि रस्त्यापासुन २० मिटर रुंदीच्या क्षेत्रात वापरास अडथळा करु नये असा आदेश दिलेला आहे. सदर आदेश व हुकूमनाम्याचे तंतोतंत पालन होणे आवश्यक आहे त्यामुळे दावा मिळकतीवरील पश्चिमेकडील ओढ्याच्या बाजुने व रस्त्याच्या शेजारील २० मिटर रुंदीच्या क्षेत्रात कोणकोणते बांधकाम आहेत याचे स्थळ निरीक्षण करुन तसा विस्तृत अहवाल दाखल करण्याचे निर्देश देणे न्यायोचित ठरेल. सदर स्थळ पाहणी करण्यासाठी तज्ञ व्यक्तीची आवश्यकता असल्याने सदर प्रकरणात तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, संगमनेर यांना न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणे योग्य वाटते. सबब, खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** अर्ज अशंतः मंजुर करण्यात येतो.

**२.** तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, संगमनेर याना सदर प्रकरणात न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमण्यात येते.

**३.** तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, संगमनेर यांनी दावा मिळकतीमध्ये जावुन वादी व प्रतिवादी यांना नोटीस देवून दावा मिळकतीचे निरीक्षण करुन रे.मु.क्र.१०१/२०१६ मधील आदेश व हुकूमनाम्याप्रमाणे नमुद असलेल्या ठिकाणी म्हणजे दावा मिळकतीवरील पश्चिमेकडील ओढ्याच्या बाजुने व रस्त्याच्या शेजारील २० मिटर रुंदीच्या क्षेत्रात कोणकोणते बांधकाम आहेत याचे स्थळ निरीक्षण करुन तसा विस्तृत अहवाल दाखल करावा.

**४.** वादी यांनी नियमाप्रमाणे न्यायालयीन आयुक्त, तालुका निरीक्षक, भुमि अभिलेख, संगमनेर यांचे शुल्क भरावे.

५. येणेप्रमाणे आयोग रिट जारी करण्यात यावे.

स्वाक्षरीत/-

संगमनेर.
(श्रीमती एस. बी. ढवळे)

दिनांक ०३/१०/२०२४.
सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, संगमनेर.